# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकुण संख्या - ३२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०२९, जमीन महसूल**<br>**रूपये:- ८,५९,५२,३४,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (१) | ११९७ | १० | सांगली कडेगांव तालुक्याची स्थापना ०६ एप्रिल, २००२ साली झाली. जवळपास २२ वर्षे होऊन सुद्धा कडेगांव तालुक्यामध्ये अव्वल कारकूनची एकुण मंजूर पदे ०६ असून ०३ पदे भरलेली असून ०३ पदे रिक्त आहेत, महसूल सहायकाची एकुण मंजूर पदे ११ असताना त्यातील एकुण ०४ पदे भरली गेली असून ०७ पदे रिक्त आहेत, तालुक्यातील एकुण ५६ गावांसाठी ३२ तलाठी पदे मंजूर आहेत त्यापैकी २४ पदे भरलेली असून ०८ पदे रिक्त आहेत. अद्यापही याठिकाणी शासनामार्फत जेष्ठ नागरिक, विधवा व परितक्ता महिला आणि निराधार लोकांसाठी असलेल्या योजनासांठी संजय गांधी योजना शाखा मंजूर नाही. उपलब्ध कर्मचारी यांचेवर या विभागाचे कामकाज केले जात असून या विभागासाठी एक नायब तहसीलदार, अव्वल कारकून व महसूल सहाय्यक पदे भरणेची आवश्यकता आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या निगडीत असलेला विषय म्हणजे पुरवठा विभाग या विभागाचे कामकाजाबाबत ग्रामस्थामध्ये नाराजीचे वातावरण असून अपुरे कर्मचारी व अधिकारी यांचेमुळे नवीन व विभक्त रेशनकार्ड, नाव वाढविणे कमी करणे व १२ अंकी नंबर या कामासाठी लोकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असून सदर रिक्त पदे लवकरात लवकर भरणेत यावीत अशी सर्व सामान्य नागरिकांची मागणी असून याबाबत करावयाची कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना. |
| | | | **श्री. हारुन खान** |
| (२) | ११२० | १०० | मौजे जऊळके खुर्द येथील गट नंबर १०४ क्षेत्र पो.ख.सह १/०३ आर यांसी आकार ३/५७ ही जमिन कै.मारुती तुकाराम बोऱ्हाडे यांचे मयत तर्फे वारस म्हणून सर्वश्री सर्जेराव मारुती बोऱ्हाडे, आनंदा मारुती बोऱ्हाडे, शांताराम बोऱ्हाडे, भानुदास मारुती बोऱ्हाडे, बबन गणपत बोऱ्हाडे, केशव किसन बोऱ्हाडे, महादेव किसन बोऱ्हाडे, श्रीमती हौसाबाई नथु बोऱ्हाडे, श्रीमती मंदाबाई नथु बोऱ्हाडे, श्रीमती नंदा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | महादेव बारणे, भिकाजी नामदेव बोऱ्हाडे सर्व रा. जऊळके खुर्द, ता. खेड, जि. पुणे यांचेकडून अर्जदार श्री.दशरथ नामदेव बोऱ्हाडे यांचे अतिक्रमण दूर करुन मिळणेसाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १३६ नुसार काढून मिळणेबाबत मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु यावर कोणतीच कारवाई न झाल्याने संबधितांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | ११९५ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयामध्ये जमीन मोजणीची अनेक प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. मोजणीसाठी अर्ज करूनही शेतकऱ्यांना अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत आहे, त्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागत आहे. जमीन मोजणी वेळेत न झाल्यामुळे शेतजमिनीच्या हद्दीबाबत वाद निर्माण होत असून जमीन खरेदी-विक्री, बँक कर्ज व इतर प्रशासकीय कामे अडथळ्यात येत आहेत. भूमी अभिलेख कार्यालयामध्ये कर्मचारी व तांत्रिक मनुष्यबळ अपुरे असल्यामुळे कामकाजावर परिणाम होत आहे. प्रलंबित मोजणी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम राबविणे व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (४) | १२१२ | १० | राष्ट्रीय महामार्ग ७५२ ई पैठण ते पंढरपूर (पालखी मार्ग) या महामार्गावरील पाटेगाव मे मुंगी रोड (ता.पैठण,जि.संभाजीनगर) या राष्ट्रीय महामार्गासाठी मौ.पोटेगाव व मौ.पैठण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने ८ वर्षापूर्वीच संपादित केल्या असणे, मात्र शेतकऱ्यांकडून संमती पत्र उशीराने घेतले असणे, महामार्गाचे काम ३ वर्षापूर्वीच पूर्ण झाले असणे, महामार्ग वाहतुकीस खुला केला असणे, परंतु शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नसणे, मौ. पाटेगाव व पैठण येथील शेतकऱ्यांने जमिनीचा मोबदला (मावेजा) मिळण्यासंदर्भात जिल्हाधिकारी संभजीनगर, तहसिलदार, पैठण, मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे दि.२४/१२/२०२५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली असणे, मात्र शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले असणे, परिणामी शेतकऱ्यांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | ११६३ | १० | राष्ट्रीय महामार्ग ७५२ ई पैठण ते पंढरपूर (पालखी मार्ग) या महामार्गावरील पाटेगाव मे मुंगी रोड (ता.पैठण,जि.संभाजीनगर) या राष्ट्रीय महामार्गासाठी मौ.पोटेगाव व मौ.पैठण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने ८ वर्षापूर्वीच संपादित केल्या असणे, मात्र शेतकऱ्यांकडून संमती पत्र उशीराने घेतले असणे, महामार्गाचे काम ३ वर्षापूर्वीच पूर्ण झाले असणे, महामार्ग वाहतुकीस खुला केला असणे, परंतु शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नसणे, मौ. पाटेगाव व पैठण येथील शेतकऱ्यांने जमिनीचा मोबदला (मावेजा) मिळण्यासंदर्भात जिल्हाधिकारी संभजीनगर, तहसिलदार, पैठण, मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे दि.२४/१२/२०२५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली असणे, मात्र शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले असणे, परिणामी शेतकऱ्यांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३ - जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- ३३,४३,९३,४५,०००/-** |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (६) | १२३७ | १०० | अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुका मोठा असून लोकसंख्या सुद्धा वाढली आहे. आणि आजही अंजनगाव सुर्जी तालुका असून सुद्धा त्या ठिकाणी महसूल चे प्रांत कार्यालय नाही. अंजनगाव सुजी तालुक्यातील जनतेला शासकीय कामाकरिता दर्यापूरच्या प्रांत कार्यालयावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शासकीय कामाचा निपटारा करण्यास वेळ सुद्धा लागतो. आकोट अचलपूर येथे एसडीओ कार्यालय आहेत. अंजनगाव सुरजी ला महसूल चे स्वतंत्र प्रांत कार्यालय त्वरित करण्यात यावे.अंजनगाव तालुक्याची लोकसंख्या लक्षात घेता अंजनगाव सुर्जीला महसूलचे प्रांत कार्यालय होणे अतिशय आवश्यक असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- १०,००,००,००,०००/-** |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (७) | १२२३ | १० | राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतांपर्यंत पोहोचण्यासाठी पानंद रस्ते तयार करण्याचा उद्देश आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात अनेक पानंद रस्त्यांना अद्यापही अधिकृत क्रमांक (नंबर) देण्यात आलेले नाहीत, त्यामुळे कामे सुरू होण्यास मोठा विलंब होत आहे. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पानंद रस्त्यांची नोंदणी व क्रमांक न मिळाल्यामुळे रस्त्यांच्या कामांसाठी निधी मंजूर होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. या कारणामुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतमाल बाहेर काढताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून वाहतुकीचा खर्चही वाढत आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी रस्ते चिखलमय होऊन शेतमाल वाहतुकीस अडथळे निर्माण होतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे सांगोला तालुक्यातील सर्व प्रलंबित पानंद रस्त्यांना तातडीने क्रमांक देऊन कामे सुरू करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (८) | १२०७ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या कुही, भिवापूर व उमरेड या तीनही तालुक्यांतील शेतकरी व ग्रामीण रस्त्यांच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे. मागील काळात शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी पानंद रस्ते मोठ्या प्रमाणावर तयार करण्यात आले होते. या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतूक, शेतीकामे आणि दैनंदिन व्यवहारासाठी मोठी सोय झाली होती. सध्या शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेतकरी पानंद रस्ते योजना नव्याने जाहीर केली आहे, ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र या योजनेच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आलेल्या समित्यांमध्ये आमदार पदसिद्ध अध्यक्ष असताना देखील इतर खाजगी किंवा राजकीय व्यक्तींना सह-अध्यक्ष म्हणून नेमण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, ही बाब योग्य नाही. विधानसभा सदस्य व लोकप्रतिनिधी यांच्याकडे आधीच स्थानिक परिस्थितीची पूर्ण माहिती असते. त्यामुळे या समित्यांमध्ये अनावश्यक राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण होते. तसेच उमरेड विधानसभा मतदारसंघातील अनेक पानंद रस्ते अद्यापही अपूर्ण आहेत किंवा त्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे या योजनेअंतर्गत नव्याने होणाऱ्या पानंद रस्त्यांमध्ये स्थानिक शेतकऱ्यांच्या गरजांनुसार योग्य नियोजन होणे आवश्यक आहे. म्हणून शासनाने पुढील बाबींचा विचार करावा: १) मुख्यमंत्री बळीराजा शेतकरी पानंद रस्ते योजनेतील समित्यांच्या रचनेत फेरबदल करावा, २) अनावश्यक सह-अध्यक्ष पदे देण्याऐवजी लोकप्रतिनिधींना अधिकृत भूमिका द्यावी, ३) उमरेड विधानसभा मतदारसंघातील कुही, भिवापूर व उमरेड तालुक्यातील प्रलंबित पानंद रस्त्यांची कामे तातडीने मंजूर करून पूर्ण करावीत, ४) या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५३, अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग**<br>**रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (९) | १२११ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघ मधील खनिज संपत्तीमधून शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होत असतानाही त्या परिसराच्या विकासाकडे होत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असलेल्या दुर्लक्षाबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे. उमरेड विधानसभा मतदारसंघात कोळसा, दगड व इतर खनिज संपत्तीच्या खाणी मोठ्या प्रमाणावर आहेत. या खाणींमधून शासनाला दरवर्षी मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो. परंतु या खाणींच्या परिसरातील गावांना प्रदूषण, रस्त्यांची हानी, पाणीटंचाई आणि पर्यावरणीय परिणामांचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत आहे. भारताच्या कायद्यानुसार खनिज उत्खननामुळे प्रभावित झालेल्या गावांच्या विकासासाठी District Mineral Foundation (DMF) अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. या निधीतून स्थानिक पायाभूत सुविधा, रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या विकासकामांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात उमरेड विधानसभा मतदारसंघातील खनिज प्रभावित गावांना या निधीतून पुरेसा विकास निधी मिळत नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे आणि अनेक विकासकामे प्रलंबित राहिली आहेत. म्हणून शासनाने पुढील बाबी तातडीने कराव्यात अशी माझी मागणी आहे, १) उमरेड विधानसभा मतदारसंघातील खनिज उत्खननामुळे प्रभावित गावांना खनिज कर्म विकास निधी (DMF) मधून प्राधान्याने निधी उपलब्ध करून द्यावा. २) खाणीमुळे बाधित गावांमध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा व इतर पायाभूत विकासकामे तातडीने हाती घ्यावीत. ३) खनिज महसूल ज्या भागातून मिळतो त्या भागाच्या विकासासाठी विशेष नियोजन करून निधीचे योग्य वाटप करावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०३०, मुद्रांक व नोंदणी**<br>**रूपये:- ४,५६,६६,७०,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (१०) | १२०९ | १० | मा.महसूल मंत्री महोदयांच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीने सदर विकासहक्क हस्तांतरण प्रकरणाची चौकशी केली असता, यामध्ये मिरा-भाईदर महानगरपालिकेत विकास हक्क हस्तांतरणाच्या (टीडीएस) 492 प्रकरणात 114 कोटी रुपयाच्या मुंद्राक चोरीसह दंड रक्कम मिळून, शासनाचे सुमारे 559 कोटी रुपये महसूलाचे अर्थिक महसूलाचे अर्थिक नुकसान झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक 12.11.2025 रोजी शासनास सादर झालेल्या अहवालाद्वारे निदर्शनास येणे, काही दस्ताऐवजाची नोंदणी आवश्यक नसली तरी मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक असतांनाही, ते न भरल्यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठया प्रमाणात अर्थिक नुकसान होणे, तसेच सदरहू बुडीत मुंद्राक शुल्क दाम-दुपट्टीने वसूल करण्याऐवजी अभय योजना आणून, शासनाच्या महसूलाचे मोठया प्रमाणात नुकसान करण्यात येणे, सदरहू घोटाळा नागरिकांनी उघडकीस आणल्यानंतर ठाणे जिल्हा सहनिबंधक कार्यालयाने नोटीसा जारी करणे, परंतू महसुलाच्या झालेल्या नुकसानीच्या वसूलीबाबत कोणतीच कार्यवाही न करता, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अभय योजना जारी मोठया प्रमाणात भ्रष्ट्राचार करण्यात येणे, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन, दोषी अधिकारी, कर्मचारी आणि विकासक यांच्या विरुध्द कारवाई करुन, विकासकाकडून नुकसान भरपाई वसूल करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | १२१३ | १० | ठाणे, मिरारोड, कळवा येथील नोंदणी कार्यालय क्र. 9 मधील वर्ग-2 चे सहदुय्यम निबंधकानी व त्याच्या सहकाऱ्यांनी दिनांक 1 आक्टोबर, 2022 ते जुलै-2025 या तीन वर्षाच्या कालावधीत विकासकरार,मुख्यत्यार पत्र आदी करारनामे 115 दस्त नोंदणी प्रकरणात क्षेत्रफळ कमी नोंदवून व नोंदणी शुल्क कमी आकारुन, अद्यापपर्यंत 12 कोटी, 24 लाख 60 हजार रुपये शासकीय महसूल बुडवून अर्थिक गैरव्यवहार केल्याचा, धक्कादायक प्रकार जिल्हयाच्या महसूल अधिकाऱ्यांच्या पथकाने केलेल्या तपासणीतून उघडकीस येणे, सदरहू महसूल अधिकाऱ्यांनी दिनांक 01 आक्टोंबर, 2022 पासून डिंसेबर, 2025 अखेरपर्यंत दस्त नोंदणी प्रकरणात कमी क्षेत्र फळ नोंदवून व कमी शुल्क आकारुन,शासनाच्या कोटयावधी रुपये महसुलाचे आर्थिक नुकसान करण्यात येणे, कळवा येथील नोंदणी कार्यालयात बाजारमुल्य निश्चित केले असतांना 38 लाख 43 हजार 898 रुपये तर 14 हजार 640 रुपये नोंदणी शुल्क कमी आकारणी करणे, मार्च ते मे, 2025 या कालावधीत विवरण पत्रात विकसन करारनामाचे 3 दस्त व 30 लाख 57 हजार 325 रुपये कमी मुद्रांक शुल्क आकारुन, त्याचा दस्तामध्ये जाणीवपूर्वक उल्लेख केला नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, सदर प्रकरणाची चौकशी व दोषी विरुध्द कारवाई करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५२, सचिवालयीन-सर्वसाधारण सेवा**<br>**रूपये:- १,०८,९४,४०,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१२) | १२१४ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या कुही, भिवापूर व उमरेड या तीनही तालुक्यांमधील महसूल विभागातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवास व्यवस्थेच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे.या तालुक्यांमध्ये उपविभागीय अधिकारी (SDO), तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच इतर महसूल विभागातील कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात पुरेशा शासकीय निवासस्थानांची उपलब्धता नाही. त्यामुळे अनेक अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना आपल्या कामाच्या ठिकाणी राहण्याऐवजी शहरांमध्ये राहावे लागते आणि दररोज ये-जा करावी लागते. यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर परिणाम होतो तसेच नागरिकांना तातडीच्या सेवांसाठी अडचणी निर्माण होतात.जर या सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातच शासकीय निवासस्थानांची सुविधा उपलब्ध करून देण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आली, तर ते त्या ठिकाणी कायमस्वरूपी राहू शकतील आणि प्रशासन अधिक कार्यक्षमतेने चालेल.म्हणून शासनाने पुढील बाबींचा विचार करावा अशी माझी मागणी आहे: १) कुही, भिवापूर व उमरेड या तालुक्यांमधील महसूल विभागातील सर्व अधिकाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने उभारण्याचा विशेष आराखडा तयार करावा. २) उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी व इतर कर्मचाऱ्यांसाठी नवीन शासकीय क्वार्टर्स बांधण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. ३) ग्रामीण भागातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी तातडीने विशेष योजना राबवावी. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (१३) | १२२९ | १० | शिरपुर ता, मालेगांव जि वाशिम ही जिल्हयातील सर्वात मोठी ग्रा.प.असून तिथे अपर तहसिल कार्यालय करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१४) | १२०६ | १० | मी उमरेड विधानसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या कुही, भिवापूर व उमरेड या तीनही तालुक्यांमधील महसूल विभागातील रिक्त पदांच्या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे.या तीनही तालुक्यांमध्ये महसूल विभागातील अनेक महत्त्वाची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. विशेषतः तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल विभागातील इतर लहान-मोठी पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण होत आहेत. तसेच अनेक महसुली मंडळांमध्ये तलाठी कार्यालय (सजा कार्यालय) उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना विविध प्रमाणपत्रे, जमीन नोंदी, फेरफार व इतर महसुली कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना प्रशासनाच्या सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी महसूल विभागाचे जाळे मजबूत असणे आवश्यक आहे. मात्र सध्या मनुष्यबळाची कमतरता आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे प्रशासनाची कामकाजे प्रभावित होत आहेत.म्हणून शासनाने पुढील बाबी तातडीने कराव्यात, अशी माझी मागणी आहे: १) कुही, भिवापूर व उमरेड या तीनही तालुक्यांमधील महसूल विभागातील सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत. २) ज्या महसुली मंडळांमध्ये तलाठी सजा कार्यालय उपलब्ध नाही, तेथे नवीन कार्यालये उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. ३) ग्रामीण भागातील महसूल कार्यालयांच्या इमारती, सुविधा व मनुष्यबळासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- २५,८७,०१,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१५) | ११५८ | १० | "नागपूर येथील वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द धरणाच्या पाणीसाठयात वाढ झाल्याने बॅकवाटरचे पाणी आवरमारा, कुजगा, चिचघाट (चापेगडी) येथील शेकडो एकर शेतात शिरल्याने गहू, चना यासारखी रब्बी पिके सडून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असल्याचे दिनांक १९/१/२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, येथे गावाला पाणीपुरवठा करणारी यंत्रणाही २० फूट पाण्याखाली गेल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर होणे, येथील ग्रामसथ मागील दोन दशकांपासून या आपत्तीचा सामना करीत असणे, त्यामुळे बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, पाण्याखाली गेलेली सर्व शेतजमीन बुडीत क्षेत्र म्हणून जाहिर करुन कायमस्वरुपी मोबदला द्यावा, वाढीव कुटूंबांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक २ हजार चौरस फुटांचे प्लॉट देऊन पुनर्वसन प्रक्रिया राबवावी, गावाला कायमस्वरुपी आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आदी येथील ग्रामस्थांच्या मागण्या असतानाही त्यावर शासन कारवाई करीत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपतींच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**रूपये:- १,०४,०८,९९,७७,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (१६) | १२१८ | १० | श्रीरामपूर राहुरी मतदारसंघात ऑगस्ट - सप्टेंबर २०२५ महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीसह घरांची देखील हानी झालेली असणे, कांदा, सोयाबीन, कपाशी आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असणे, या अचानक आलेल्या आपत्तीमुळे शेतकरी उध्वस्त झाले असणे, तसेच काही गावांमध्ये घरांमध्ये पाणी शिरल्याने घरांची पडझड होऊन नागरिक बेघर झाले असणे, श्रीरामपूर - राहुरी मतदारसंघातील झालेल्या नुकसानीसाठी काही अतिवृष्टीग्रस्तांना नुकसानभरपाई अद्यापही मिळालेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१७) | ११५६ | १० | दि. २३ रोजी उमरेड तालुक्यात (जिल्हा नागपूर)विजांच्या कडकडाटासह वादळी वारा, अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. विशेषतः आमगाव देवळी, मुरझडी, तांबेखनी व भिवगड या शिवारांतील उभी पिके भुईसपाट झाली असणे, या आपत्तीमध्ये कापूस, हरभरा, गहू, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मिरची, संत्रा, पपई तसेच भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांच्या छतावरील टिनपत्रे, कवेलू तसेच अन्न धान्याचेही नुकसान झाले असणे, आधीच नापिकी व वाढत्या खर्चामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर हे दुहेरी संकट ओढवले असणे, प्रशासनाने प्राथमिक पाहणी केली असली तरी अनेक ठिकाणी पंचनामे पूर्ण झालेले नाहीत व शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही आर्थिक मदत जाहीर झालेली नाही. त्यामुळे तात्काळ संयुक्त सर्वेक्षण पूर्ण करून मदतीचे आदेश जाहीर करावेत. तसेच शेतकऱ्यांना आगाऊ अनुदान द्यावे. व पीकविमा कंपन्यांना त्वरित नुकसानभरपाई देण्याचे सरकारने निर्देश द्यावेत. तसेच वीज व सिंचन सुविधा तातडीने पूर्ववत कराव्यात. ही बाब शेतकऱ्यांच्या जगण्याशी संबंधित असून शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा अशी शेतकऱ्यांमधून मागणी करण्यात आली असणे, परंतु शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, वेळकाडूपणाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ११६० | १० | नागपूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत सध्या केवळ महसूल मंडळ स्तरावर हवामान केंद्रे कार्यरत असणे, एकाच मंडळातील दोन गावांमधील पर्जन्यमानात मोठी तफावत असू शकते त्यामुळे 'एकाला मदत तर दुसरा वंचित' ही वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आलेली असणे, केंद्र सरकारच्या 'वेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डाटा सिस्टीम' विंड्स (WINDS) अंतर्गत राज्यातील २८,००० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे आणि स्वयंचलित वर्षामापक यंत्रे बसविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असणे, या प्रकल्पांतर्गत बसविण्यात येणारी यंत्रणा केवळ पाऊसच मोजणार असून त्यामध्ये तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग, आणि सौर विकिरण मोजण्याची क्षमता नसणे, अचूक हवामान डेटा अभावी पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांचे दावे फेटाळले जाण्याचे प्रमाण मोठे असणे, ग्रामपंचायत स्तरावर ही यंत्रणा बसविल्यानंतर, विमा कंपन्यांना गावपातळीवरील डेटा स्वीकारणे बंधनकारक केले जाणार असणे, अनेक ठिकाणी जुनी हवामान केंद्रे देखभाल अभावी बंद असणे, 'विंड्स' प्रकल्पांतर्गत बसवल्या जाणाऱ्या नवीन यंत्रणेच्या देखभालीसाठी ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार असणे, सदरील डेटा सरकारी वापरासाठी असेल की सर्वसामान्य जनतेला पाहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाईल याबाबत संदिग्धता असणे, शेतकऱ्यांच्या मोबाईलवर 'ॲप'द्वारे थेट उपलब्ध होत असणे, येत्या पावसाळ्यापूर्वी (जून २०२६) महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**रूपये:- ३८,८९,७८,३२,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (१९) | १२०५ | १० | सांगली जिल्हयातील सागरेश्वर अभयारण्य व चौरंगीनाथ व डोंगराई मंदिर परिसर येथील इमारत दुरुस्ती व सोयीसुविधा पुरविण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजय चौधरी** |
| (२०) | ११३७ | १०० | राज्यातील सर्व प्राणिसंग्रहालय नगरविकास विभागाच्या महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली येत असून वन्यजीव संरक्षण अधिनियम व प्राणिसंग्रहालय मान्यता नियम इत्यादी अनुसूची मध्ये संरक्षित वन्यजीव संबधी नियमांचे काटेकोर पालन केले जात नसणे, वन विभागाचे प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने वन्यजीव संरक्षणासंदर्भात अनेक त्रुटी दिसून येतात. इतर राज्यातील प्राणिसंग्रहालय वन विभागाच्या अखत्यारित येतात.सदर प्रारिणसंग्रहालयांवर थेट त्या राज्याच्या वनविभागाचे नियंत्रण असते. त्यामुळे वन्यजीव संरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणे शक्य होते. त्यामुळे देशातील इतर राज्याच्या धर्तीवर राज्यातील सर्व प्राणिसंग्रहालय वनविभागाच्या थेट अखत्यारित यावे. अथवा प्राणिसंग्रहालयावर वनविभागाचे सक्षम अधिकारी नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमित झनक** |
| (२१) | १२३४ | १० | वाशिम जिल्हयातील वन प्राण्यामुळे मोठया प्रमाणात शेत व शेतपिकांचे नुकसान होत असुन जंगल व शेतामध्ये चर खोदून खोलीकरण करणे जेणेकरुन प्राणी शेतात येणार नाहीत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२२) | १२१५ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात वन विभागाच्या कार्यालयांमध्ये कर्मचारी संख्या अत्यल्प असल्यामुळे कामकाजावर परिणाम होत आहे. वनक्षेत्राचे संरक्षण, वन्य प्राण्यांचे नियंत्रण व नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पुरेसे वनरक्षक व इतर कर्मचारी उपलब्ध नाहीत. सांगोला तालुक्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या घटना वाढत असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मनुष्यबळ अपुरे आहे. कर्मचारी अपुरे असल्यामुळे वनसंवर्धन, गस्त, तसेच वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाची तपासणी व पंचनामे करण्यास विलंब होत आहे. त्यामुळे वन संरक्षण प्रभावीपणे करण्यासाठी आणि नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी सांगोला तालुक्यात वन विभागातील कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२३) | १११० | १० | भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील NNTR (नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव प्रकल्प) परिसर लक्षात घेता साकोली तालुक्यात Tiger & Leopard Transit Treatment Center सुरू करणे. उपचारानंतर सुरक्षित पिंजरा/एनक्लोजरमध्ये ठेवलेल्या वाघ व बिबट्यांसाठी नियोजित वन्यजीव सफारी प्रकल्प सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ११११ | १० | भंडारा व गोंदिया वनविभागातील रिक्त पदे भरणे आवश्यक असून आस्थापना विभागातील, वनरक्षक इ. पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | १११२ | १० | भंडारा व गोंदिया जिह्यातील वनविभाग विश्रामगृह बांधकाम साकोली, लाखनी लाखांदुरामध्ये अधिकृत वन विभाग विश्रामगृह नसणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | १११३ | १० | राज्यातील वन क्षेत्रात बुरड समाजाकरिता बांबू उपलब्धता नसणे साकोली विधानसभा क्षेत्रामध्ये बुरड समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून ते पारंपरिक पद्धतीने बांबूपासून टोपल्या, सुप, चटया, घरगुती व कृषी उपयोगाच्या वस्तू तयार करतात. परंतु बांबू मिळण्यात अडचणी येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२७) | ११५५ | १० | मुंबईतील बोरीवली पूर्व येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील उर्वरीत 13786 झोपडीधारक गेले 24 वर्षापासून पुर्नवसनाचे काम रखडल्याने मा. उच्च न्यायालयाने निवृत्त न्यायमुर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 16.10.2025 रोजी समिती स्थापन करण्यात येणे, सदरहू उद्यानातील झोपडीधारकांचे 24 वर्षानंतरही पुनवर्सन होऊ न शकल्याने मा.न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करुन पुनवर्सनासाठी मरोळ-मरोशी स्थित 90 एकरच्या 3 नव्या जागा 2 आठवडयात शोधण्याचे आदेश दिनांक 12.11.2025 रोजी देण्यात येऊनही, यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही न होणे, पुनवर्सनाच्या संथगतीबाबत राज्यशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येणे, यावर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीनंतर या जागेवर झोपडीधारकांचे पुनवर्सन करणे शक्य असल्याचे, शासनाच्या महाधिवक्त्यांनी न्यायालयास सांगणे, एंकदरितच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील झोपडीधारकांचे पुनवर्सन करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने अनेकवेळा आदेश देऊनही यावर कृती आराखडा तयार करुन त्याची तत्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणतीही पावले उचलण्यात न आल्याने पुनवर्सनाची समस्या आजही कायम असणे, मा. उच्च न्यायालयाने आदेश देऊनही संजय गांधी राष्ट्रीय उद्यान अतिक्रमण मुक्त होण्यास निर्माण झालेली अडचण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२८) | १२५४ | १० | राज्यात विशेषता: पुण्यातील जुन्नर तालुका,अहिल्यानगर, नाशिक,धुळे, सोलापूर,मराठवाडा व नागपूर येथील परिसरातील जंगलातून शेत शिवारात व नंतर थेट वस्तीत घुसणाऱ्या बिबटयांच्या संचारामुळे ग्रामीण लोकवस्तीत प्रचंड दहशतीचे व घबराटीचे वातावरण असणे, सन-2021 ते डिसेंबर 2025 अखेरपर्यंत पाच वर्षात बिबटयाच्या हल्यात 377 नागरिकांचा मृत्यु झाल्याची घटना घडणे, उपरोक्त परिसरातील बिबटयांची वाढती संख्या विचारात घेता बिबटयाची गणना करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेणे, बिबटयाचे हल्ले रोखण्याकरिता ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने,राज्य शासनाने माहे,डिंसेबर 2025 मध्ये स्थापन केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर करुनही, अद्याप शासनाकडून यावर उपाययोजना करण्याबाबत कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | १२५६ | १० | मुंबईतील मालाड (पूर्व) येथील न्यु रॉयल हिल्स को.ऑप.सोसायटीचे 77 रो-हाऊस व शेजारी न्यु म्हाडा कॉलनी येथे सुमारे 5 हजार रहिवाशी कुटुंबे वास्तव्य करीत असलेल्या परिसरात नोव्हेंबर ते डिसेंबर, 2025 आणि जानेवारी, 2026 या कालावधीत बिबट्याचा संचार वाढल्याने येथील जनतेत भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, सदरहू लोकवस्तीमध्ये बिबटयाचे तसेच अन्य वन्यजीवांचा संचार होत असल्यामुळे भविष्यात होणारी जीवीतहानी रोखण्यासाठी सोसायटीने म्हाडाची परवानगी घेऊन संरक्षक जाळया बसविण्यात येणे, परंतू बिबटे संरक्षक जाळी ओलांडून बिबटे सोसायटी परिसरात प्रवेश करीत असणे तसेच शेजारील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची सहा फुट उंच जाळी ओलांडून बिबटे सोसायटी परिसरात वांरवांर प्रवेश करीत असल्याने, येथील नागरीक जीव मुठीत घेऊन भीतीदायक जीवन जगत असून, नागरिकांना दिवसा-ढवळया बाहेर पडणे देखील कठीण होत असणे, शासनाने जीवीतहानी टाळण्यासाठी बिबटयाचे संभाव्य हल्ले रोखण्याकरिता तातडीने कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३०) | १२१७ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघ मधील कुही, भिवापूर आणि उमरेड या तीनही तालुक्यांमधील जंगल क्षेत्राशी संबंधित गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे.उमरेड मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर जंगल क्षेत्र आहे, जेथे विविध वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात आढळतात आणि अनेक गावांचा परिसर जंगलाशी जोडलेला आहे. त्यामुळे वनसंवर्धन, वन्यप्राणी संरक्षण तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसाठी वन विभागाचे प्रभावी कामकाज अत्यंत आवश्यक आहे.परंतु प्रत्यक्षात या मतदारसंघातील कुही, भिवापूर व उमरेड तालुक्यात वन विभागातील अनेक महत्त्वाची पदे रिक्त आहेत. वरिष्ठ अधिकारी, वनरक्षक, वनपाल तसेच इतर कर्मचारी यांच्या अनेक जागा दीर्घकाळभरून भरल्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गेल्या नाहीत.यामुळे जंगल व्यवस्थापन, वन्यप्राणी नियंत्रण, जंगलातील संरक्षण उपाययोजना तसेच गावकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण या बाबींमध्ये मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी वनसंवर्धनाच्या कामावर परिणाम होत असून शासनालाही संभाव्य महसुली तोटा सहन करावा लागत आहे. म्हणून शासनाने पुढील बाबी तातडीने कराव्यात अशी माझी मागणी आहे: १) कुही, भिवापूर व उमरेड तालुक्यातील वन विभागातील सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत. २) जंगल परिसरातील गावांसाठी वनसंरक्षण व वन्यप्राणी प्रतिबंधक उपाययोजना मजबूत कराव्यात. ३) वन व्यवस्थापन सुधारण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३१) | ११७५ | १० | मुंबई मालाड (प.) येथे मार्वे टी जंक्शन ते पोसरी तलाव पर्यंत खारफुटीच्या संरक्षणासाठी मार्वे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वन विभागाचे कम्पाऊंड वॉलचे बांधकाम सुरु असणे, येथे २७.४५ मीटर रुंदींचा रस्ता असणे, तेथे वन विभाग रस्ता बांधत असणे, ही भिंत बांधण्यावर फक्त १८-३० मीटर रुंदीचा रस्ता उपलब्ध होणार असणे, तसेच २०.४५ मीटदर रुंदीचा रस्ता बांधण्यासाठी सिमेंट कॉंक्रीट रोड बांधण्याचे टेंडर काढण्यात येणे, तसेच खारफुटीच्या पुर्नलागवणीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या रस्ते विभागाने सादर करणे, त्यामुळे भिंत बांधण्यास वन विभागाचा व राज्य शासनाचा निधी वाया जाणार असणे, म्हणून हे काम वन विभागाने थांबवून रस्ता बांधल्यानंतर आर.एल. नुसार राज्य शासनाने भिंत बांधण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-९**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ६२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी कर्ज**<br>**रूपये:- १,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (३२) | ११९८ | १० | मी उमरेड विधानसभा मतदारसंघ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे.गेल्या पावसाळयात माझ्या मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टी व पुराची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले तसेच काही ठिकाणी शेतीची जमीन खरडून गेली. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून अनुदान जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात आजपर्यंत अनेक पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये त्या अनुदानाची रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे आधीच नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाने घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात मदत पोहोचण्यात मोठा विलंब होत आहे. या परिस्थितीमुळे उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कुही, व भिवापूर या तिन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये शासनाबद्दल तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ याची दखल घेऊन उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम त्वरित जमा करावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई